**<u>विशेष दिवाणी दावा नं.४८५/२०२३(नि.३७ लगत)</u>**

**<u>जादा सरतपास वादीतर्फे ॲड. एम. एस. राऊत यांचेतर्फे सुरू</u> :**

१. मला आता कागदयादी नि.क्रं.३९ लगत अ.नं.१ वरील करारनामा दाखविणेत आला. दि.२७.०५.२०१३ रोजी करारनामा माझ्यासमक्ष लिहला. त्याचा स्टॅम्प सुरेश सोमनाथ भिसे याने खरेदी केला होता. सदरचा करारनामा हा प्रतिवादीने वादीला लिहुन दिला होता. त्यावर साक्षीदार क्रं.१ म्हणुन माझी सही आहे. त्यावर दुसरे साक्षीदार बापु पाटील संभाजी धायगुडे यांची सही आहे. तसेच त्यावर अंजना सोमनाथ भिसे व सोमनाथ भिसे यांची सही आहे. तसेच त्यावर वादीची सही आहे. करारनाम्यातील मजकुर प्रतिवादीने सांगितला. सदर करारनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्रं.४०</u>** देणेत येते.

२. मला आता कागदयादी नि.क्रं.३९ लगत अ.नं.२ वरील साठेखत दाखविणेत आले. दि.२२.११.२०११ रोजी साठेखत माझ्यासमक्ष लिहले. त्याचा स्टॅम्प वादीने खरेदी केला होता. सदरचे साठेखत हे प्रतिवादीने वादीला लिहुन दिले होते. त्यावर साक्षीदार क्रं.१ म्हणुन माझी सही आहे. त्यावर दुसरे साक्षीदार बापु पाटील संभाजी धायगुडे यांची सही आहे. तसेच त्यावर अंजना सोमनाथ भिसे व सोमनाथ भिसे यांची सही आहे. तसेच त्यावर वादीची सही आहे. साठेखतातील मजकुर प्रतिवादीने सांगितला. सदर साठेखतातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्रं.४१</u>** देणेत येते.

सदरचे प्रकरण प्रतिवादीविरुद्ध एकतर्फा चालल्याने उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.

स्थळ : वाई.
दिनांक : १४.१०.२०२५